चंद्रपूर शहरातील अध्यापक महाविद्यालयातील प्रशिक्षणार्थ्यांच्या अंतर्मुखी व बहिर्मुखी व्यक्तिमत्वाचा तुलनात्मक अभ्यास.

डॉ. अनिल यु. मोरे
श्री साई शिक्षण महाविद्यालय, चंद्रपूर

प्रस्तावना:

भारताला स्वातन्त्र्य मिळाल्यानंतर भारतीय शिक्षणक्षेत्रात परिवर्तन घडवून आणण्यासाठी शासनाने विविध आयोग नेमले त्यामध्ये उच्च शिक्षण आयोग, माध्यमिक शिक्षण आयोग, कोठारी शिक्षण आयोग, राष्ट्रीय शैक्षणिक धोरण – १९८६ इ. यासारख्या अनेक आयोगांनी शिक्षणाची गुणवत्ता वाढवण्यासाठी अनेक शिफारशी सुचविल्या त्यातील काही शिफारशीची शासनाने अंमलबजावणी देखील केली. मात्र शिक्षण क्षेत्रामध्ये पाहिजे ते परिवर्तन झालेले दिसत नाही. यापाठीमागे अनेक कारणे असली तरीही शिक्षकांचे व्यक्तीमत्व व त्यांच्या व्यक्तीमत्वातील अंतर्मुखी व बहिर्मुखी घटक हा सुध्दा तीतकाच जबाबदार आहे. शैक्षणिक मानसशास्त्रानुसार शिक्षकाला बालकांचे मानसशास्त्र समजून घ्यावे लागते त्याचप्रमाणे शिक्षकाला स्वत: चे मानसशास्त्र समजून घेणेही गरजेचे आहे. त्यासाठी शिक्षकांनी व्यक्तिमत्व विकासावर भर दयायला हवा. व्यक्तिमत्व हा शब्द 'Personality' या इंग्रजी शब्दाचे भाषांतर आहे. 'Personality' हा शब्द मूळच्या 'Persona' या लॅटिन शब्दापासून तयार झाला आहे. त्याचा अर्थ मुखवटा असा होतो. प्राचीन काळी नाटकातील पात्र आपल्या चेहऱ्यावर मुखवटा लावीत यावरून आपणास असा अर्थ काढता येईल की व्यक्तिमत्व हा शब्द व्यक्तीच्या बाहयरूपासी समरूप आहे. परंतु काळानुसार ही कल्पना बदलत गेली. आणि मानसशास्त्रज्ञांनी एकत्रित गुणसमुच्चयाचा विचार केला. मानसशास्त्रात व्यक्तिमत्व म्हणजे व्यक्तीने दाखविलेल्या व्यक्तीगत आणि अभिनव कृती होय.

ऑलपोर्ट यांच्या मते – ''व्यक्तिमत्व म्हणजे स्वपरिसराशी व्यक्तीचे जे वैशिष्टयपूर्ण समायोजन होत असते त्याला कारणीभूत ठरणारे, वर्तनाला चालना देणारे शारीरिक – मानसिक प्रक्रियांचे गतिशील संघटन होय.'' श्री. युंग या शै. मानसशास्त्रज्ञाने स्वभावानुसार व्यक्तिमत्वाचे दोन प्रकार सांगीतले आहेत. अंतर्मुखी व्यक्तिमत्व असलेली व्यक्ती आपण ठरविलेली मूल्ये लक्षात घेवून निर्णय घेणारी, मनाने हळवी, आत्मपरीक्षण करणारी, मितभाषी, आदर्शवादी, एकल्लकोंडया स्वभावाची व काटेकोर असते. तर बहिर्मुखी व्यक्तिमत्व असलेली व्यक्ती परिस्थितीशी जुळवून घेणारी, मोकळेपणाने बोलणारी, व्यवहारकुशल, कृतिप्रवण, व्यक्ती व परिसर यांचा विचार करून निर्णय घेणारी असते.

शिक्षणशास्त्राची पदवी मिळालेली प्रत्येक व्यक्ती ही सर्वांगाने परिपूर्ण असेलच असे नाही, मात्र ती परिपूर्ण असावी अशी समाजाची अपेक्षा असते. कारण शिक्षकांचे व्यक्तिमत्व सर्वगुणसंपन्न असेल तर तो घडविणाऱ्या पिढीसमोर स्वत: चा आदर्श निर्माण करू शकतो. त्यामुळे शिक्षकांच्या व्यक्तिमत्वाचा अभ्यास करणे गरजेचे आहे. व्यक्तिमत्वाची व्याख्या प्रत्येक मानसशास्त्रज्ञाने वेगवेगळी केलेली आढळते. त्यामध्ये अंतर्मुखी व बहिर्मुखी व्यक्तिमत्व असे व्यक्तिमत्वाचे दोन प्रकार सांगीतले आहे. दोघांचेही स्वभाव वैशिष्टये हे भिन्न व विरूध्द असतात. शिक्षकांचे व्यक्तिमत्व हे शिक्षणक्षेत्रासी निगडीत असल्यामुळे ते सर्व घटकांच्या दृष्टीने महत्वपूर्ण आहे. त्यामुळेच प्रशिक्षणार्थी

शिक्षकांच्या व्यक्तिमत्वाचा अभ्यास करणे गरजेचे आहे. म्हणून संशोधकाने सदर समस्या संशोधनासाठी निवडली आहे.

संशोधनाची गरज आणि महत्व:

बी.एड् प्रशिक्षणार्थ्यांनी शिक्षणक्षेत्रामध्ये नुकताच प्रवेश घेतलेला असल्याकारणाने त्यांचे व्यक्तिमत्व शिक्षकी पेशासी साजेसे असले पाहिजे अन्यथा शिक्षण प्रक्रिया कोलमडल्याशिवाय राहणार नाही. प्रशिक्षणार्थ्यांची स्वभाव वैशिष्टये, त्यांचा अंतर्मुखी व बहिर्मुखीपणा याचांही अभ्यास होणे गरजेचे आहे. अंतर्मुखी व बहिर्मुखी व्यक्तीच्या गुणवैशिष्टयांच्या आधारावर बी.एड् महाविद्यालयातील विद्यार्थी व विद्यार्थीनी प्रशिक्षणार्थी त्या गुणवैशिष्टयामुळे अध्यापन करण्यास कितपत समर्थ आहे. हे ठरवून मुल्यमापन करता येते. जर प्रशिक्षणार्थ्यांचे व्यक्तिमत्व परिपूर्ण असेल तरच तो प्रशिक्षणार्थी भविष्यामध्ये आपल्या विद्यार्थ्यांना परिपूर्ण बनवू शकतो. प्रशिक्षणार्थ्यांने प्रशिक्षण काळात अध्यापनाचा सराव केलेला असतो. मात्र व्यक्तिमत्व घटकाच्या विकासात वंश व परिसर महत्वाची भूमिका बजावतात, त्यामुळे मुलांचे व्यक्तिमत्व पूर्ण की मुलींचे व्यक्तिमत्व पर्ण असे म्हणता येत नाही. तर व्यक्तिमत्वाचे मापन होणे गरजेचे आहे. त्यानुसार अगदी प्रवेशाच्या वेळी अंतर्मुखी व बहिर्मुखी व्यक्तिमत्व चाचण्यांचा वापर करून महाविद्यालयात प्रवेश देता येईल काय. यासारखे प्रश्न निर्माण झाले आणि त्यासाठी ही समस्या संशोधन करण्यासाठी संशोधकाने निवडली.

समस्या विधान:

''चंद्रपूर शहरातील अध्यापक महाविद्यालयातील प्रशिक्षणार्थ्यांच्या अंतर्मुखी व बहिर्मुखी व्यक्तिमत्वाचा तुलनात्मक अभ्यास.''

संशोधनाची उदिष्टये:

१. बी.एड् प्रशिक्षणार्थ्यामधिल व्यक्तीमत्व घटकांचा शोध घेणे.
२. बी.एड् प्रशिक्षणार्थ्यामधिल लिंगभेदानुसार अंतर्मुखी व बहिर्मुखी व्यक्तिमत्वाची तुलना करणे.
३. बी.एड् ग्रामिण व शहरी प्रशिक्षणार्थ्यामधिल अंतर्मुखी व बहिर्मुखी व्यक्तिमत्वाची तुलना करणे.

संशोधनाच्या परिकल्पना:

१. बी.एड् प्रशिक्षण घेणाऱ्या प्रशिक्षणार्थ्यामध्ये अंतर्मुखी व बहिर्मुखी व्यक्तिमत्वामध्ये फरक दिसून येतो.
२. बी.एड् प्रशिक्षण घेणाऱ्या प्रशिक्षणार्थ्यामध्ये लिंगभेदानुसार अंतर्मुखी व बहिर्मुखी व्यक्तिमत्वामध्ये फरक दिसून येतो.
३. बी.एड् प्रशिक्षण घेणाऱ्या ग्रामिण व शहरी प्रशिक्षणार्थ्यामध्ये अंतर्मुखी व बहिर्मुखी व्यक्तिमत्वामध्ये फरक दिसून येतो.

संशोधनाची व्याप्ती व मर्यादा:

प्रस्तुत संशोधन हे चंद्रपूर जिल्हयापूरते मर्यादित असून सत्र २०१८ – १९ या कालावधीत चंद्रपूर जिल्हयातील बी.एड् महाविद्यालयातील प्रशिक्षणार्थी मुले व मुली यांच्या अंतर्मुखी व बहिर्मुखी व्यक्तिमत्व घटकांच्या वैशिष्टयांपुरते मर्यादित आहे.

संशोधन पध्दती:

प्रस्तुत संशोधनासाठी संशोधकाने सर्वेक्षण पध्दतीची निवड केली आहे. कारण सर्वेक्षण पध्दतीच्या सहाय्याने सदर क्षेत्रातील माहिती लवकरात लवकर मिळते व ती माहिती संशोधनासाठी समाधानकारक असते.

न्यादर्श: प्रस्तुत संशोधनासाठी चंद्रपूर जिल्हयातील विविध बी.एड् महाविद्यालयातील प्रशिक्षणार्थी छात्राध्यापक व छात्राध्यापिका यांची प्रत्येकी १०० या प्रमाणे असंभाव्यता पध्दतीतील सप्रयोजन पध्दतीनुसार न्यादर्श म्हणून निवड केली.

संशोधनाची साधने:

प्रस्तुत संशोधनासाठी वाय. सिंग आणि एच. एम. सिंग यांची 'अंतर्मुखी व बहिर्मुखी व्यक्तिमत्व शोधिका' ही प्रमाणित चाचणी वापरली असून त्यामध्ये एकुण ५६ विधानांचा समावेश केलेला आहे.

सांख्यिकीय साधने:

प्राप्त माहितीचे विश्लेषण व अर्थनिर्वचन करण्यासाठी शेकडा प्रमाण, मध्यमान, प्रमाण विचलन व सार्थकता तपासण्यासाठी ज – टेस्ट चा वापर करण्यात आला.

छात्राध्यापकांच्या माहितीचे विश्लेषण

	छात्राध्यापक				
	शहरी ५०		ग्रामिण ५०		
प्रकार	अंतर्मुखी	बहिर्मुखी	अंतर्मुखी	बहिर्मुखी	
प्रमाण	१२	३८	२८	२२	१००
शेकडा प्रमाण	२४:	७६:	५६:	४४:	

छात्राध्यापिकांच्या माहितीचे विश्लेषण

	छात्राध्यापिका				
	शहरी ५०		ग्रामिण ५०		
प्रकार	अंतर्मुखी	बहिर्मुखी	अंतर्मुखी	बहिर्मुखी	
प्रमाण	१६	३४	३५	१५	१००
शेकडा प्रमाण	३२:	६८:	७०:	३०:	

शहरी व ग्रामिण भागातील प्रशिक्षणार्थ्यांच्या अंतर्मुखतेची मध्यमानाच्या आधारे सार्थकतेची तुलना

प्रतिसादक	मध्यमान	प्रमाणविचलन	ज. स्कोअर
शहरी प्रशिक्षणार्थी	२२.६	४.५७	३.५
ग्रामिण प्रशिक्षणार्थी	२०.१५	५.४१	

शहरी व ग्रामिण भागातील प्रशिक्षणार्थ्यांच्या बहिर्मुखतेची मध्यमानाच्या आधारे सार्थकतेची तुलना

प्रतिसादक	मध्यमान	प्रमाणविचलन	ज. स्कोअर
शहरी प्रशिक्षणार्थी	२४.८	४.१९	८.८८
ग्रामिण प्रशिक्षणार्थी	१९.६	४.२६	

निष्कर्ष:

अंतर्मुखतेबाबतचे निष्कर्ष:

१. शहरी छात्राध्यापकामध्ये अंतर्मुखता कमी दिसून आली.

२. ग्रामिण छात्राध्यापकामध्ये अंतर्मुखता जास्त दिसून आली.

३. शहरी छात्राध्यापिकांमध्ये अंतर्मुखता कमी दिसून आली.

४. ग्रामिण छात्राध्यापिकांमध्ये अंतर्मुखता जास्त दिसून आली.

५. ग्रामिण व शहरी प्रशिक्षणार्थ्यांच्या अंतर्मुखतेत सार्थ फरक आहे. ग्रामिण प्रशिणार्थ्यांमध्ये अंतर्मुखतेचे प्रमाण जास्त दिसून आले.

बहिर्मुखतेबाबतचे निष्कर्ष:

१. शहरी छात्राध्यापकामध्ये बहिर्मुखता जास्त दिसून आली.

२. ग्रामिण छात्राध्यापकामध्ये बहिर्मुखता कमी दिसून आली.

३. शहरी छात्राध्यापिकांमध्ये बहिर्मुखता जास्त दिसून आली.

४. ग्रामिण छात्राध्यापिकांमध्ये बहिर्मुखता कमी दिसून आली.

५. ग्रामिण व शहरी प्रशिक्षणार्थ्यांच्या बहिर्मुखतेत सार्थ फरक आहे. ग्रामिण प्रशिक्षणार्थ्यांमध्ये बहिर्मुखता कमी दिसून आली.

शिफारशी:

१. महाविद्यालयामध्ये वेळोवेळी परिसंवाद, गटचर्चा, कृतीसत्रे व सेमिनार यांचे आयोजन करावे. जेणेकरून प्रशिक्षणार्थी त्यामध्ये सक्रिय भाग घेतील.

२. महाविद्यालयातील प्रशिक्षणार्थ्यांची बहिर्मुखता वाढविण्यासाठी व्यक्तिमत्व विकास, संमोहन तंत्र यासारख्या कार्यक्रमांचे आयोजन करावे.

३. अभ्यासक्रमाची पूर्णपणे अंमलबजावणी करावी.

४. शिक्षक व्यक्तिमत्व विकास हा विषय अभ्यासासाठी असावा.

५ शिक्षकांची नियुक्ती करतांना शासनाने अंतर्मुखी व बहिर्मुखी घटक तपासण्यासाठी आवश्यक असणाऱ्या चाचण्यांचा वापर करावा.

संदर्भ ग्रंथ सूची:

१. घोरमोडे कृष्णा ;२००८ शैक्षणिक संशोधनाची मुलतत्वे, नागपूर: विद्या प्रकाशन.

२. करंदिकर डॉ. सुरेश ;२००६ शैक्षणिक मानसशास्त्र, कोल्हापूर: फडके प्रकाशन

३. जगताप ह. ना. ;२००४ शैक्षणिक व प्रयोगिक मानसशास्त्र, पुणे: नित्यनुतन प्रकाशन.

४. पाटिल डॉ. सुरेश. ;२००८ शैक्षणिक मूल्यमापन, लातून: संस्कार प्रकाशन

५. भिंताडे डॉ. वि. रा ;२००७ शैक्षणिक संशोधन पध्दती, पुणे: नूतन प्रकाशन

६. कुमार के. सुभाष ;२००९ शैक्षणिक मानसशास्त्र, नागपूर: विद्या प्रकाशन